**महत्वपूर्ण अटी व शर्ती** (एमआयटीसी)

बजाज हाऊसिंग फायनान्स लिमिटेड ("**बीएचएफएल**" किंवा "**लेंडर**") आणि कर्जदार ("**कर्जदार**" किंवा "**कस्टमर**") यांच्यात मंजुरी पत्रात सविस्तर नमूद केल्यानुसार अटी व शर्तींना सहमती झाल्यानंतर, लोन करार ("**लोन करार**"), टॉप-अप लोन परिशिष्ट, वितरण पत्र आणि/किंवा इतर डॉक्युमेंट, जर असल्यास (एकत्रितपणे "**लोन डॉक्युमेंट्स**" म्हणून संदर्भित), मुख्य अटी व शर्ती या एमआयटीसी मध्ये नमूद केल्या आहेत.

लोन डॉक्युमेंट्सच्या अटी व शर्तींसह संयुक्तपणे हे एमआयटीसी वाचणे आवश्यकच आहे. कर्जदाराने घेतलेले लोन हे लोन डॉक्युमेंटद्वारे नियंत्रित केले जाईल. याठिकाणी दर्शविलेले एमआयटीसी आणि लोन डॉक्युमेंट्समधील कोणत्याही विवादाच्या स्थितीत, लोन डॉक्युमेंट्सच्या अटी व शर्ती ग्राह्य धरल्या जातील. आम्ही कस्टमर लॉग-इन क्रेडेन्शियल (यूजर आयडी आणि पासवर्ड) जारी करू ज्याद्वारे कस्टमर लोनचा करार ॲक्सेस करू शकतात. जर कस्टमर पोर्टल वर लोन करार ॲक्सेस करण्यास असमर्थ असेल तर लोन कराराची प्रत प्रदान करण्यासाठी विनंती केली जाऊ शकते आणि त्यानंतर लोन कराराची फोटोकॉपी उपलब्ध केली जाईल.

**ॲप्लिकेशन नं.:** ______________________________

**लोनचे स्वरूप:** ☐ सिक्युअर्ड लोन ☐ अनसिक्युअर्ड लोन

**लोन प्रकार:** ☐ फ्रेश/ खरेदी ☐ बीटी ☐ बीटी + टॉप-अप ☐ टॉप-अप

1. **लोन रक्कम:**

2. **इंटरेस्ट प्रकार:**

   फ्लोटिंग: ☐ बीएचएफएल फ्लोटिंग रेफेरेंस रेट (एफआरआर) ☐ रेपो रेट

   ☐ फिक्स्ड

   **इंटरेस्ट रेट**:

   फ्लोटिंग रेट: % p.a. (एफआरआर / रेपो ___% +/- ___% स्प्रेड)

   फिक्स्ड रेट: % p.a.



⊗ सर्व अर्जदार/सह-अर्जदारांनी स्वाक्षरी केलेली असावी

**अधिस्थगन किंवा अनुदान**:

**इंटरेस्ट रिसेटची तारीख** (**जर असल्यास**):

**इंटरेस्ट रेटमधील बदलांच्या सूचनेचे माध्यम**:

बीएचएफएल तिच्या विवेकबुद्धीनुसार लोन कालावधी दरम्यान कर्जदाराला पूर्वसूचित करून आणि कर्जदाराला योग्य ती माहिती देऊन, बीएचएफएल एफआरआर मधील किंवा एक्स्टर्नल बेंचमार्क (एक्स्टर्नल बेंचमार्क लिंक्ड लोनसाठी) किंवा अंतर्गत पॉलिसीमधील बदलांमुळे किंवा नियामक आवश्यकतामुळे किंवा डिफॉल्टच्या कोणत्याही घटनेमुळे, ज्यात समावेश आहे परंतु मर्यादित नाही असे करारांतर्गत लोन वितरणानंतर कर्जदाराद्वारे निष्पादित होणारे / दिले जाणारे लेंडरला आवश्यक असलेले कोणतेही डॉक्युमेंट्स प्रदान करण्यात / निष्पादित करण्यात कर्जदाराद्वारे होणारा विलंब, यानुसार इंटरेस्ट रेटमध्ये वृद्धी किंवा घसरण करण्यास हक्कदार आहे. इंटरेस्ट रेट मधील कोणत्याही सुधारणा पुढील तारखेपासून प्रभावी आहेत. बीएचएफएल द्वारे इंटरेस्ट रेट मधील अशा बदलाची माहिती, रजिस्टर्ड कम्युनिकेशन ॲड्रेसवर पत्र पाठवून / रजिस्टर्ड ई-मेलवर मेल पाठवून अथवा रजिस्टर्ड मोबाईल नंबरवर आणि/किंवा त्यांची वेबसाईट अपडेट करण्याद्वारे माहिती दिली जाईल. वर नमूद केलेल्या कोणत्याही दोन कम्युनिकेशनच्या पद्धतींद्वारे दिलेली अशी माहिती कर्जदाराला पुरेशी सूचना दिली म्हणून समजण्यात येईल. जर असे बदल कर्जदारास नुकसानकारक वाटत असल्यास, तर कर्जदार 60 दिवसांच्या आत आणि सूचना न देता लोन अकाउंट बंद करू शकतो किंवा कोणतेही अतिरिक्त शुल्क किंवा इंटरेस्ट देय न करता लोन अकाउंट स्विच करू शकतो.

**3. लोन कालावधी:**

**4. लोनचा उद्देश:**

- ☐ निवासी प्रॉपर्टी खरेदी / बिल्डर कडून खरेदी/ पुनर्विक्री खरेदी / प्लॉट + कन्स्ट्रक्शन/ सेल्फ-कन्स्ट्रक्शन (हा पर्याय केवळ हाऊसिंग लोनच्या बाबतीत लागू आहे)
- ☐ वैयक्तिक वापर (वेतनधारी टॉप-अप प्रकरणांसाठी)
- ☐ बिझनेस उद्देश*
- ☐ अन्य वापर (कृपया नमूद करा) ________________________________

***लोन उद्देश: खालील लोन बिझनेस हेतूसाठी लोन म्हणून वर्गीकृत केले जातील:**

- भाडेतत्त्वावर सवलतीची कर्जे.
- व्यवसायाच्या हेतूसाठी घेतलेले संपत्ती सापेक्ष कर्ज म्हणजेच खेळते भांडवल, कर्ज एकत्रितकरण, व्यवसाय कर्जाची परतफेड, व्यवसायाचा विस्तार, व्यवसाय मालमत्तेची प्राप्ती किंवा निधीचा कोणताही समान अंतिम वापर
- गैर-निवासी संपत्तीच्या खरेदीसाठी कर्ज.
- गैर-निवासी संपत्तीच्या सुरक्षेच्या सापेक्ष कर्ज.

- व्यवसायाच्या हेतूसाठी टॉप-अप लोन म्हणजेच खेळते भांडवल, लोन एकत्रितकरण, बिझनेस लोन रिपेमेंट, बिझनेसचा विस्तार, बिझनेस मालमत्ता प्राप्त करणे किंवा निधीचा समान अंतिम वापर.

**5. इंस्टॉलमेंट प्रकार: मासिक**

 **टर्म लोन**

 **फ्लेक्सी टर्म लोन**

 **फ्लेक्सी हायब्रिड लोन**

**लोन अकाउंटमध्ये कस्टमरने केलेल्या पेमेंटचे समायोजन:**

I. टर्म लोन (फ्लेक्सी टर्म लोन सह):

a) पेमेंट गेटवे व्यतिरिक्त अन्य कोणत्याही पद्धतीमार्फत पेमेंट करणारे कस्टमर (म्हणजेच. आरटीजीएस/एनईएफटी/आयएमपीएस/यूपीआय इ.): कंपनीला क्लिअर फंड प्राप्त झाल्यानंतर लोन अकाउंटमध्ये क्रेडिट केले जाईल (अयशस्वी ट्रान्झॅक्शन वगळता सामान्यपणे त्याच दिवशी).

b) पेमेंट गेटवेद्वारे मार्फत पेमेंट करणारे कस्टमर (उदा. bill desk): कंपनीला फंड प्राप्त झाल्यावर लोन अकाउंटमध्ये क्रेडिट केले जाईल (सामान्यपणे T+1 दिवस, जिथे T ही कस्टमर अकाउंट साठी डेबिट तारीख आहे).

c) बँकिंग सुट्ट्या या क्रेडिट कालावधी गणनेसाठी वगळण्यात आल्या आहेत. कारण कंपनीकडे फंड प्राप्त होत नाही म्हणूनच तो T+1 दिवसांपेक्षा जास्त असू शकतो. कस्टमरला पेमेंट गेटवेद्वारे पैसे ट्रान्सफर करण्यापूर्वी विशेषत: बँकिंग सुट्टया तपासण्याचा सल्ला दिला जातो कारण की एकापेक्षा जास्त बँकिंग सुट्ट्या असू शकतात. कस्टमरच्या बँक अकाउंटमध्ये डेबिट आणि क्रेडिट यामधील फरक T+1 दिवसांपेक्षा जास्त असू शकतो.

d) जिथे कस्टमर अकाउंट मधून डेबिट केले जाते परंतु पेमेंट गेटवेमध्ये त्रुटीमुळे कंपनीला विलंबाने क्रेडिट प्राप्त होते. तेव्हा कंपनी अकाउंटमध्ये क्रेडिट प्राप्त झाल्याच्या दिवशी कस्टमर अकाउंटमध्ये क्रेडिट केले जाईल.

II. फ्लेक्सी टर्म लोनसाठी अतिरिक्त अटी जिथे लोन रक्कम ₹1.00 कोटी पेक्षा अधिक असेल:

a) फ्लेक्सी पेमेंट साठी कट-ऑफ वेळ सामान्य बँकिंग कामकाजाच्या दिवशी 1 p.m. असेल.

b) बँकिंग कामकाजाच्या दिवशी 1:00 p.m. पूर्वी ट्रान्सफर केलेली रक्कम: त्याच दिवशी लोन अकाउंटमध्ये क्रेडिट केली जाईल. [पेमेंट गेटवेद्वारे पेमेंट वगळता, खंड: I(b) मध्ये नमूद केल्याप्रमाणे]

c) बँकिंग कामकाजाच्या दिवशी 1:00 p.m. नंतर ट्रान्सफर केलेली रक्कम: T+1 दिवशी लोन अकाउंटमध्ये क्रेडिट केली जाईल.

d) बँकिंग सुट्टीच्या दिवशीचे पेमेंट: लोन अकाउंटमध्ये क्रेडिट पुढील कामकाजाच्या दिवशी केले जाईल. कस्टमरला पेमेंट गेटवेद्वारे पैसे ट्रान्सफर करण्यापूर्वी विशेषत: बँकिंग सुट्टी तपासण्याचा सल्ला दिला जातो. कारण की एकापेक्षा जास्त बँकिंग सुट्टी असू शकतात, कस्टमरच्या बँक अकाउंटमध्ये डेबिट आणि क्रेडिट मधील फरक T+1 दिवसांपेक्षा जास्त असू शकतो.

e) जिथे कस्टमर अकाउंट मधून डेबिट केले जाते परंतु पेमेंट गेटवेमध्ये त्रुटीमुळे कंपनीला विलंबाने क्रेडिट प्राप्त होते. तेव्हा कंपनी अकाउंटमध्ये क्रेडिट प्राप्त झाल्याच्या दिवशी कस्टमर अकाउंटमध्ये क्रेडिट केले जाईल.

## 6. सिक्युरिटी

- बीएचएफएल च्या नावे तारण म्हणून देऊ केल्या जाणाऱ्या प्रॉपर्टी सापेक्ष निर्मित / निर्माण होणारा आकार आणि / किंवा बीएचएफएल च्या नावे निर्माण होणारे अन्य कोणतेही तारण/सिक्युरिटी हे लोनची सिक्युरिटी म्हणून विचारात घेतले जाते, जे लोन डॉक्युमेंट्समध्ये सविस्तर दिले आहे. सिक्युरिटी याचा अर्थ असेल आणि त्यात समाविष्ट असेल, लोन सिक्युअर करण्यासाठी आणि त्यानुसार कर्जदाराद्वारे सादर करण्यासाठी बीएचएफएल द्वारे योग्य ठरविलेले गहाण, हमी आणि इतर कोणत्याही प्रकारची सिक्युरिटी. कर्जदार बीएचएफएल द्वारे आवश्यक असलेले टायटल डीड्स, डॉक्युमेंट, रिपोर्टची मूळ/प्रत जमा करेल.
- निर्दिष्ट सिक्युरिटीच्या निर्मितीसाठी देय असलेल्या सर्व शुल्काची कर्जदार पूर्तता करेल आणि त्याच्या परिपूर्णतेसाठी आवश्यक सर्व पायऱ्यांची पूर्तता करेल.

नोंद: जर ते अनसिक्युअर्ड लोन असेल तर सिक्युरिटी संदर्भात उपरोक्त क्लॉज लागू होणार नाहीत.

## 7. प्रॉपर्टी/कर्जदारांचा इन्श्युरन्स आणि मूल्यवर्धित उत्पादने

- कर्जदाराची जबाबदारी असेल की सिक्युरिटी म्हणून देऊ केलेली प्रॉपर्टी, , लोनच्या कालावधीदरम्यान संपूर्ण लाभार्थी म्हणून बीएचएफएल कडे ती लोन मूल्याइतकी अथवा त्यापेक्षा जास्त रकमेसाठी सगळ्या जोखीमांपासून इन्श्युर्ड केली आहे. बीएचएफएल ला जेव्हा आवश्यक असेल तेव्हा त्याचा पुरावा बीएचएफएल कडे सादर केला जाईल.
- इन्श्युरन्स कंपनीने जारी केलेल्या इन्श्युरन्स पॉलिसीच्या अटी व शर्तीनुसार क्लेम आणि कव्हरेजची अंमलबजावणी केली जाईल.
- बीएचएफएल मास्टर पॉलिसीधारकाच्या क्षमतेत विविध ग्रुप इन्श्युरन्स पॉलिसी अंतर्गत केवळ त्यांच्या कस्टमरची नोंदणी करू शकते. बीएचएफएल ची भूमिका ही कस्टमरच्या, इन्श्युरन्स कंपनीकडून

इन्श्युरन्स पॉलिसीसाठी अर्ज करण्याच्या विनंतीवरून सुविधा देण्यापुरती केवळ मर्यादित आहे. तथापि, इन्श्युरन्स पॉलिसी जारी करण्याचा निर्णय, आवश्यक इन्श्युरन्स कव्हरेज प्रदान करणे आणि पॉलिसी अंतर्गत कोणताही भविष्यातील क्लेम, पूर्णपणे इन्श्युरन्स कंपनीचा असेल. इन्श्युरन्स हा आग्रहाचा विषय आहे आणि कर्जदाराने स्वेच्छिकपणे त्याचा लाभ घेण्याचा विचार केला आहे. बीएचएफएल कोणतीही वॉरंटी देत नाही आणि इन्श्युरन्स प्रॉडक्ट, इन्श्युरन्स प्रॉडक्टच्या अंतर्निहित अटी व शर्ती आणि/किंवा फायदे, इन्श्युरन्स कंपनीद्वारे क्लेमवर प्रक्रिया करण्याच्या पद्धती, याविषयी सूचित करत नाही. तसेच बीएचएफएल, इन्श्युरन्स पॉलिसी आणि/किंवा क्लेम, क्लेमवर प्रक्रिया करण्याची पद्धत इ. यासाठीची विनंती स्वीकारणे किंवा नाकारणे यासाठी कोणत्याही प्रकारे जबाबदार असणार नाही. इन्श्युरन्स पॉलिसीच्या संदर्भात असलेल्या सर्व किंवा कोणत्याही तक्रारी केवळ इन्श्युरन्स कंपनीकडे थेट घेतल्या जातील.

- मूल्यवर्धित उत्पादने ह‍ा विनंतीचा विषय आहे आणि कर्जदाराने स्वेच्छेने त्याचा लाभ घेण्याचा विचार केला आहे. बीएचएफएल ची भूमिका केवळ सेवा प्रदात्यांच्या अशा मूल्यवर्धित उत्पादनांसाठी अर्ज करण्यासाठी ग्राहकाच्या विनंतीनुसार सुविधा देण्यापुरती केवळ मर्यादित आहे. बीएचएफएल कडे कोणतीही वॉरंटी नाही आणि ऑफर केलेल्या उत्पादनांबद्दल, अंतर्निहित अटी आणि शर्ती आणि/किंवा उत्पादनांचे फायदे, तृतीय पक्षाद्वारे दावे/सेवांवर प्रक्रिया करण्याची पद्धत याबद्दल कोणतेही प्रतिनिधित्व करत नाही. बीएचएफएल कोणत्याही प्रकारे देऊ केलेल्या तृतीय-पक्ष उत्पादनांच्या स्वीकृती किंवा नाकारण्यासाठी आणि/किंवा दावे, दावे/सेवा इत्यादींच्या प्रक्रियेच्या पद्धतीसाठी जबाबदार असणार नाही. मिळवलेल्या उत्पादनांच्या संदर्भात सर्व किंवा कोणत्याही तक्रारी थेट सेवा प्रदात्याकडेच घेतल्या जातील.

**8. लोन वितरणाच्या अटी**

- मंजुरी पत्र, लोन करार आणि अन्य लोन डॉक्युमेंट्समध्ये बीएचएफएल द्वारे नमूद केल्याप्रमाणे सर्व संबंधित डॉक्युमेंट्स सबमिट करणे;
- ***जर हे सिक्युअर्ड लोन असेल तर*** खालील अतिरिक्त अटी कस्टमरला पूर्ण कराव्या लागतील:
  - प्रॉपर्टीचे कायदेशीर आणि तांत्रिक मूल्यांकन;
  - सिक्युरिटी म्हणून देऊ केलेल्या प्रॉपर्टीचे स्पष्ट, विपणनयोग्य आणि कर्जाचा बोजा नसलेली मालकी;
  - जर लोन हे होम लोन असेल, तर कर्जदाराद्वारे प्रॉपर्टी खरेदीसाठी स्वत:चे योगदान देण्याचा पुरावा बीएचएफएल कडे सादर करावा लागेल;
  - प्रॉपर्टी/प्रॉपर्टीज यांवर केलेले बांधकाम, मान्यताप्राप्त योजनांनुसार आणि लागू कायदे/उप-कायदे/नियम आणि नियमांनुसार करण्यात आलेले आहे;

- प्रॉपर्टीसाठी सर्व आवश्यक मंजुरी (मर्यादेशिवाय समाविष्ट आहे, मंजूर योजना आणि वैधानिक मंजुरी) प्राप्त करण्यात आली आहे आणि बीएचएफएल ला सादर केली गेली आहे.

## 9. लोन रिपेमेंट

- कर्जदार लोन करार किंवा टॉप-अप लोन परिशिष्टमध्ये सेट केलेल्या रिपेमेंट पद्धतीने किंवा अशा प्रकारे आणि अशा ठिकाणी की जे कर्जदार आणि बीएचएफएल दरम्यान सहमत झाले आहे, संबंधित देय तारखेला किंवा त्यापूर्वी देय तारखेला ईएमआय/मासिक इंस्टॉलमेंट आणि अन्य थकित देय रक्कम बीएचएफएल ला रिपेमेंट करण्यास सहमत आहे.
- बीएचएफएल कर्जदाराच्या लेखी विनंतीनुसार, रिपेमेंट पद्धत बदलण्यास सहमत असू शकतो. बीएचएफएल, कोणत्याही वेळी, आपल्या स्वत:च्या निर्णयानुसार रिपेमेंटचे शेड्यूल सुधारित करू शकतो आणि कर्जदाराला त्या अनुषंगाने सूचित करू शकतो.
- ईएमआय/मासिक इंस्टॉलमेंट रक्कम अशी काढली जाईल जेणेकरून त्यात लोन रकमेची परतफेड आणि लोन कालावधीतील इंटरेस्ट दरानुसार कॅल्क्युलेट केलेल्या इंटरेस्टची फेड समाविष्ट केली जाईल. कर्जदार हा लोनच्या अंतर्गत सर्व थकित देय ~~कडे~~ बीएचएफएल कडे पूर्णपणे भरले जाईपर्यंत ईएमआय/मासिक इंस्टॉलमेंट भरणे सुरू ठेवण्यास सहमत आहे.

## 10. अतिदेय वसूल करण्यासाठी अनुसरण करण्याची संक्षिप्त प्रक्रिया

लोन करार आणि अन्य लोन डॉक्युमेंट्समध्ये नमूद केल्याप्रमाणे डिफॉल्टच्या कोणत्याही घटनेवर ("**डिफॉल्ट इव्हेंट**"), कर्जदाराने बीएचएफएल ला देय असलेली सर्व थकित रक्कम देय होईल आणि बीएचएफएल लोन करार आणि अन्य लोन डॉक्युमेंट्स अंतर्गत, ज्यात उशिरा पेमेंट केल्यास डिफॉल्ट इंटरेस्ट आकारणी, थकीत रकमेची वसुली यांचा समावेश आहे परंतु तितकेच मर्यादित नाही, आवश्यक प्रक्रिया/उपाय करण्याचा त्यांचा अधिकार राखून ठेवते. तसेच, सिक्युअर्ड लोनच्या बाबतीत, कायद्यानुसार उपलब्ध उपायानुसार बीएचएफएल सिक्युरिटी लागू करण्यास पात्र असेल. बीएचएफएल हे अधिकार राखून ठेवते:

- लोनसह थकित रकमेचे रिपेमेंट ॲक्सीलरेट करणे.
- लोन डिमांड वर ठेवणे किंवा लोन संदर्भात कर्जदाराद्वारे देय सर्व थकित रक्कम देय आणि त्वरित देययोग्य आहे असे घोषित करणे.
- डिफॉल्ट इंटरेस्टची दंडात्मक इंटरेस्ट रेट आणि अन्य कोणतेही लागू असलेले दंडात्मक शुल्क याप्रमाणे आकारणी करणे, ज्यामध्ये बाऊन्स शुल्क समाविष्ट आहे.
- लोन प्रलंबित असताना लागू असलेल्या कायद्यांतर्गत कंपनी कडे उपलब्ध असू शकलेल्या अशा इतर हक्क आणि उपायांचे उपयोजन करणे.

- अशा अन्य अटी निश्चित करणे किंवा कंपनीला अनुरुप ठरेल तशी कृती करणे;
- लागू असलेला इंटरेस्ट रेट सुधारित करणे; आणि/किंवा
- आरबीआय, एनएचबी, स्टॉक एक्सचेंज, माहिती उपयोगिता, ऑडिटर्स, सिबिल आणि इतर माहिती ब्युरो आणि इतर कोणत्याही वैधानिक/नियामक प्राधिकरण आणि/किंवा कोणत्याही कायदेशीर/नियामक आवश्यकतेनुसार या वतीने अधिकृत असलेल्या इतर कोणत्याही एजन्सी, यांना कर्जदाराचा सर्व लोन अकाउंट तपशील जाहीर करण्याचा अधिकार आहे.
- कर्जदाराचे नाव, पत्ता, फोटो, सिक्युरिटी तपशील (लागू असल्यास) आणि अशी कर्जदाराची अन्य माहिती जी बीएचएफएल ला योग्य वाटेल, ती तो त्याच्या स्वतःच्या विवेकबुद्धीनुसार इलेक्ट्रॉनिक, प्रिंट आणि सोशल मीडियामध्ये सार्वजनिक करेल आणि अशा सार्वजनिकीकरणामध्ये अशा प्रकारच्या डिफॉल्टची वास्तविकतेचा समावेश असेल; आणि कर्जदार सहमती देतो की अशा प्रकारे अशी माहिती सार्वजनिक केल्याने कर्जदाराला झालेल्या कोणत्याही हानी आणि/किंवा नुकसानासाठी, मग ते आर्थिक असो अथवा अन्य असो, बीएचएफएल जबाबदार किंवा बांधील नाही.
- अशी कोणतीही प्रॉपर्टी, ज्यावर त्यांच्या स्वतःद्वारे अथवा कोणत्याही वसुली दलालाद्वारे अथवा लेंडरने नियुक केलेल्या वकिलाद्वारे सिक्युरिटी तयार केली आहे, असल्यास तिचा ताबा घेणे.

**11. वार्षिक थकित बॅलन्स स्टेटमेंट**

बीएचएफएल कर्जदाराला त्याच्या विनंतीवरून वार्षिक थकित बॅलन्स स्टेटमेंट जारी करेल.

**12. फेअर प्रॅक्टिस कोड**

कंपनीचा योग्य प्रॅक्टिस कोड खाली दिलेल्या लिंकमध्ये ऑनलाईन संदर्भित केला जाऊ शकतो https://www.bajajhousingfinance.in/notice-board

**13. कस्टमर सर्व्हिसेस**

| | |
|---|---|
| ईमेल | bhflwecare@bajajfinserv.in |
| कॉल | 022 - 45297300 |
| ऑनलाईन कस्टमर पोर्टल | https://myaccount.bajajhousingfinance.in/#/home |
| ब्रँचला भेट देण्याची वेळ | 10:00 AM ते 6:00 PM |

वर नमूद केलेल्या कोणत्याही चॅनेल्सद्वारे केलेल्या शंकांना 7 कामकाजाच्या दिवसांमध्ये कर्जदारासाठी कार्यवाही करून निराकरण केले जाईल.

(i) **लोन अकाउंट स्टेटमेंट-** लोन अकाउंट स्टेटमेंट हे ऑनलाईन डाउनलोड केले जाऊ शकते. पर्यायाने, कस्टमर ब्रँचमध्ये जाऊन किंवा वर दर्शविलेल्या कस्टमर केअर नंबर वर कॉल करूनही स्टेटमेंट प्राप्त करू शकतो.

(ii) **टायटल डॉक्युमेंट्सची फोटोकॉपी -** जर कस्टमरने प्रॉपर्टीचे टायटल आणि लिंक डॉक्युमेंट्स सादर करून सिक्युअर्ड लोन घेतले असेल तर प्रॉपर्टीच्या टायटल आणि लिंक डॉक्युमेंट्सची फोटोकॉपी कस्टमरला, त्याच्याकडून लिखित विनंती प्राप्त केल्यावर प्रदान करण्यात येईल आणि ते खालील फी/शुल्क विभागात परिभाषित केल्यानुसार लागू शुल्काच्या पेमेंटच्या अधीन असेल. टेक ओव्हर /बॅलन्स ट्रान्सफर लोन्सच्या बाबतीत, टायटल आणि लिंक डॉक्युमेंट्सच्या फोटोकॉपीसाठी कस्टमरने केलेली विनंती, ट्रान्सफर करणारी बँक /फायनान्शियल संस्थेकडून टायटल आणि लिंक डॉक्युमेंट्स प्राप्त झाल्याच्या अधीन सुलभ केली जाईल.

(iii) **लोन बंद** झाल्यावर **/ ट्रान्सफर झाल्यावर मूळ टायटल आणि लिंक डॉक्युमेंट्स परत करणे -** लेंडर बीएचएफएल द्वारे प्राप्त झालेले प्रॉपर्टीचे मूळ डॉक्युमेंट्स, बीएचएफएल चे सर्व / कोणतेही थकित देय बंद झाल्यापासून कामकाजाच्या 20 दिवसांच्या आत परत केले जातील.

## 14. तक्रार निवारण

तुमचे पत्र प्राप्त झाल्यानंतर कामकाजाच्या 2 दिवसांमध्ये पोचपावती/प्रतिसाद तुम्हाला प्राप्त होईल

| | |
|---|---|
| लेव्हल 1 | आम्ही 15 कामकाजाच्या दिवसांमध्ये कस्टमरच्या शंका/समस्यांचे निराकरण करण्यासाठी वचनबद्ध आहोत.(काही स्थितीमध्ये अधिकतम 30 दिवसांचा कालावधी लागू शकतो) जर विहित मुदतीत संपर्क न झाल्यास किंवा शंकेचे आमच्या उपायाने समाधान न झाल्यास कस्टमर आम्हाला याठिकाणी लिहू शकतात<br><br>bhflgrievance@bajajfinserv.in |
| लेव्हल 2 | जर कस्टमर लेव्हल 1 मध्ये दिलेल्या निराकरणाने समाधानी नसेल तर 2 कामकाजाच्या दिवसांत कस्टमर त्याची/तिची तक्रार - तक्रार निवारण अधिकाऱ्यास खालील ईमेल आयडी वर करू शकतो<br><br>Bhflcustomerexperience@bajajfinserv.in<br>तसेच, कस्टमर दुसरा पर्याय म्हणून तक्रार निवारण अधिकाऱ्यास खालील ॲड्रेसवर तक्रार कळवू शकतो:<br>बजाज हाऊसिंग फायनान्स लिमिटेड,<br>5th फ्लोअर, B2 सेरेब्रम आयटी पार्क,<br>कुमार सिटी कल्याणी नगर पुणे,<br>महाराष्ट्र पिन– 411014 |

| | |
|---|---|
| लेव्हल 3 | जर कस्टमरचे लेव्हल 2 प्रमाणे 5 कामकाजाच्या दिवसांच्या आत समाधान न झाल्यास कस्टमर त्या/तीची तक्रार कस्टमर हेडकडे येथे नोंदवू शकतात:<br><br>Hema.ratnam@bajajfinserv.in<br><br>पर्यायाने, कस्टमर नॅशनल मॅनेजर-सर्व्हिस यांच्याकडे खालील ॲड्रेसवर तक्रार दाखल करू शकतो<br>हेमा रतनम<br>बजाज हाऊसिंग फायनान्स फायनान्स लिमिटेड<br>5th फ्लोअर, B2 सेरेब्रम आयटी पार्क,<br>कुमार सिटी कल्याणी नगर पुणे,<br>महाराष्ट्र पिन- 411014 |
| लेव्हल 4 | वर नमूद केलेल्या मॅट्रिक्स प्रमाणे 15 कामकाजाच्या दिवसांच्या आत कस्टमरच्या तक्रारींचे तक्रारीचे निराकरण न झाल्याच्या स्थितीत कस्टमरच्या समाधानासाठी, तक्रार दाखल केल्यापासून 30 दिवसांच्या आत कस्टमर National Housing Bank कडे https://grids.nhbonline.org.in या लिंकद्वारे ऑनलाईन स्वरुपात किंवा https://nhb.org.in/ येथे तक्रार विभागांतर्गत उपलब्ध विहित नमुन्यात खाली दिलेल्या ॲड्रेसवर ऑफलाईन स्वरुपात तक्रार दाखल करण्याद्नारे संपर्क साधू शकतो.<br><br>**नॅशनल हाऊसिंग बँक,**<br>पर्यवेक्षण विभाग,<br>(तक्रार निवारण कक्ष),<br>4th फ्लोअर, कोअर-5A, इंडिया हॅबिटॅट सेंटर,<br>लोधी रोड,<br>नवी दिल्ली- 110003 |

**15. तक्रार प्रक्रिया**

खाली नमूद प्रक्रियेचे अनुसरण कर्जदाराने bhflgrievance@bajajfinserv.in वर लिहून पाठविल्यानंतर केले जाईल :

- कस्टमर सर्व्हिस असोसिएट कस्टमरच्या शंका / तक्रार जाणून घेण्यासाठी संपूर्ण ई-मेलचे वाचन करील
- कस्टमरने नमूद केलेल्या आणि न केलेल्या आवश्यकता समजावून घेण्यासाठी त्याच्याकडे विचारणा केली जाते.
- निर्धारित वेळेनुसार तक्रारींचे निराकरण करण्यासाठी तक्रार टीम अंतर्गत विभागांशी समन्वय साधते.

- जर निर्धारित 7 दिवसांच्या कालावधीच्या आत, अंतर्गत आणि बाह्य परावलंबित्वामुळे, निराकरण शक्य नसेल तर वेळेच्या मर्यादेसह अंतरिम प्रतिसाद कर्जदारास पाठविला जातो.
- सर्व शंका ईमेलवर आणि टेलिफोन कॉलद्वारे पूर्ण केल्या जातात.

प्रतिबद्ध कालावधीमध्ये कोणत्याही विस्ताराची आवश्यकता असल्यास कर्जदाराला वेळेवर अपडेट पाठविण्यात येते.

## 16. फी आणि अन्य शुल्क

खाली नमूद केल्याप्रमाणे फी/शुल्क संपूर्णपणे बजाज हाऊसिंग फायनान्स लिमिटेडच्या विवेकबुद्धीनुसार बदलाच्या अधीन आहेत. कोणत्याही बदलासाठी कर्जदारास, लेंडरच्या बीएचएफएल च्या वेबसाईट https://www.bajajhousingfinance.in/notice-board वर नमूद केलेल्या शुल्काच्या नवीन शेड्यूलचा, जे लागू असेल, संदर्भ घेण्याची विनंती केली जाते.

खाली नमूद केल्याप्रमाणे फी/शुल्क हे कर्जदाराद्वारे अशा शुल्क/आकारणी यासारख्या कमाल देय रकमेचे सूचक आहेत. लोन डॉक्युमेंट्समध्ये नमूद फी/शुल्क हे अचूक देय रक्कम दर्शविते. विशिष्टपणे नमूद केल्याशिवाय, अदा केलेली फी/शुल्क रिफंड करण्यायोग्य नाही.

| सी.नं. | फी/शुल्काचे स्वरूप | फी/ शुल्काचे नाव | केव्हा देय असेल | फ्रिक्वेन्सी | रक्कम |
|---|---|---|---|---|---|
| 1. | होम लोन / लोन अगेंस्ट प्रॉपर्टी साठी फी | प्रोसेसिंग फी | ॲप्लिकेशन वर | एकदा | लोन रकमेच्या 7% पर्यंत + जीएसटी लागू असेल त्याप्रमाणे |
| 2. | टॉप-अप लोनसाठी फी | प्रोसेसिंग फी | ॲप्लिकेशन वर | एकदा | लोन रकमेच्या 7% पर्यंत +जीएसटी लागू असेल त्याप्रमाणे |
| 3. | अनसिक्युअर्ड लोनसाठी फी | प्रोसेसिंग फी | ॲप्लिकेशन वर | एकदा | लोन रकमेच्या 7% पर्यंत + जीएसटी लागू असेल त्याप्रमाणे |
| 4. | **दंडात्मक शुल्क / डिफॉल्ट इंटरेस्ट रेट** | **अतिरिक्त इंटरेस्ट** | **जमा रकमेवर** | **मासिक** | **थकित रकमेवर लागू इंटरेस्ट रेट सह प्रति वर्ष 24%** |
| 5. | कॉस्ट कव्हर करण्यासाठी खर्च | आकस्मिक शुल्क | प्रस्तावित खर्चावर | | प्रत्यक्ष वर |
| 6. | वैधानिक शुल्क | स्टॅम्प ड्युटी/एमओडीटी/एमओई | संबंधित कायद्यांनुसार | एकदा | राज्य कायद्यांनुसार लागू |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| 7. | कमी रेटसाठी स्विच | स्विच फी | रेट सुधारणा वर | प्रत्येक रेट कन्व्हर्जन | मूळ थकबाकीच्या 4.5% पर्यंत + जीएसटी लागू असेल त्याप्रमाणे |
| 8. | इंटरेस्ट गणनेमध्ये स्विच (उदा. बीएचएफएल एफआरआर ते रेपो रेट आणि उलटपक्षी) | स्विच फी | इंटरेस्ट गणना बदलावर | प्रत्येक स्विचवर | मूळ थकबाकीच्या 4.5% पर्यंत + जीएसटी लागू असेल त्याप्रमाणे |
| 9. | गहाण ओरिजिनेशन फी एमओएफ) (नॉन-रिफंडेबल रक्कम) - सिक्युअर्ड लोनसाठी | एमओएफ हे प्रोसेसिंग फी पेक्षा अधिक | ॲप्लिकेशन वर | एकदा | ₹ 10000 पर्यंत + जीएसटी लागू असेल त्याप्रमाणे |
| 10. | बाउन्स शुल्क | विविध पावती | चेक/ईसीएस/एनएसीएच अनादर स्थितीत | अनादराच्या संख्येवर अवलंबून असते | सिक्युअर्ड: (see table below) |
| 11. | चेक स्वॅप शुल्क | विविध पावत्या | विनंतीनुसार | जेव्हा आणि केव्हा | **निरंक** |
| 12. | सिक्युरिटी स्वॅप शुल्क | विविध पावत्या | विनंतीनुसार | जेव्हा आणि केव्हा | **निरंक** |
| 13. | बाह्य अभिप्रायाबद्दल फी | विविध पावत्या | प्रस्तावित खर्चावर | जेव्हा आणि केव्हा | आलेल्या खर्चानुसार |
| 14. | मंजुरीपासून 6 महिन्यानंतर लोनचे पुनर्मूल्यांकन | प्रोसेसिंग फी | पुन्हा केलेल्या ॲप्लिकेशनवर | एकदा | मॉर्टगेज ओरिजिनेशन फी लागू असल्यास |

सिक्युअर्ड:

| **लोन रक्कम (₹ मध्ये)** | **बाऊन्स शुल्क (₹ मध्ये)** |
|---|---|
| 15,00,000 पर्यंत | 500 |
| 15,00,001 - 30,00,000 | 1,000 |
| 30,00,001 - 50,00,000 | 1,500 |
| 50,00,001 - 1,00,00,000 | 2,000 |
| 1,00,00,001 - 5,00,00,000 | 3,000 |
| 5,00,00,001 - 10,00,00,000 | 5,000 |
| 10,00,00,001 आणि त्यापुढील | 10,000 |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| 15. | अकाउंट स्टेटमेंटची हार्ड कॉपी | विविध पावत्या | विनंतीवर | विनंती नुसार | प्रति विनंती ₹500 पर्यंत + जीएसटी लागू असेल त्याप्रमाणे |
| 16. | विद्यमान लोनचे नवीन प्रॉडक्टमध्ये रुपांतरण (टर्म लोन/फ्लेक्सी टर्म लोन/फ्लेक्सी हायब्रिड लोन) | रुपांतरण शुल्क | रुपांतरण झाल्यावर | प्रत्येक रुपांतरण वर | मूळ थकबाकीच्या 2% पर्यंत + जीएसटी लागू असेल त्याप्रमाणे |
| 17. | फ्लेक्सी लोन फी | प्रोसेसिंग फी | फ्लेक्सी टर्म लोन किंवा फ्लेक्सी हायब्रिड लोन प्राप्त करण्यावर | एकदा | लोन रकमेच्या 2% पर्यंत + जीएसटी लागू असेल त्याप्रमाणे |
| 18. | फ्लेक्सी वार्षिक मेंटेनन्स शुल्क - फ्लेक्सी हायब्रिड लोन | वार्षिक मेंटेनन्स शुल्क | फ्लेक्सी हायब्रिड लोनवर लागू | वार्षिक शुल्क | फ्लेक्सी इंटरेस्ट ओन्ली लोन रिपेमेंट कालावधी दरम्यान मंजूर रकमेच्या 1% पर्यंत + जीएसटी लागू असल्याप्रमाणे आणि फ्लेक्सी टर्म लोन कालावधी दरम्यान उपलब्ध फ्लेक्सी लोन मर्यादेच्या 1% पर्यंत + जीएसटी लागू असेल त्याप्रमाणे |
| 19. | फ्लेक्सी वार्षिक मेंटेनन्स शुल्क - फ्लेक्सी टर्म लोन | वार्षिक मेंटेनन्स शुल्क | फ्लेक्सी टर्म लोनवर लागू | वार्षिक शुल्क | उपलब्ध फ्लेक्सी लोन मर्यादेच्या 1% पर्यंत + जीएसटी लागू असेल त्याप्रमाणे |
| 20. | सीईआरएसएआय शुल्क (सिक्युअर्ड लोन्ससाठी) | सीईआरएसएआय रजिस्ट्रेशन साठी शुल्क | ॲप्लिकेशन वर | एकदा | प्रत्येक लोनसाठी, सीईआरएसएआय द्वारे आकारलेले शुल्क + जीएसटी लागू असेल त्याप्रमाणे |
| 21. | सिक्युरिटी फी (सिक्युअर्ड लोन्ससाठी) | प्रोसेसिंग फी | ऑनलाईन ॲप्लिकेशन वर | एकदा | ₹ 9999 + जीएसटी लागू असेल त्याप्रमाणे |
| 22. | टायटल डॉक्युमेंट्सच्या फोटोकॉपीसाठी शुल्क | विविध पावत्या | विनंतीवर | विनंती नुसार | 30 पेजेसपर्यंत ₹500/- किमान फी आणि त्यानंतरच्या प्रत्येक अतिरिक्त पेजसाठी ₹3/- + जीएसटी लागू असेल त्याप्रमाणे |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| | (सिक्युअर्ड लोन्ससाठी) | | | | |
| 23. | पूर्ण झालेल्या कर्जाचे कागदपत्रे पुनर्प्राप्ती शुल्क | विविध पावत्या | विनंतीनुसार | प्रति विनंती | बीएचएफएल द्वारे `मूळ मालमत्ता कागदपत्रांचे संकलन' करण्याचे आवाहन केल्यापासून 15 दिवसांच्या आत पूर्ण झालेल्या कर्जाची कागदपत्रे संकलित न केल्यास ₹ 1000/- (जीएसटीसह) शुल्क लागू होते. |

**प्री-पेमेंट शुल्क**

| **फ्लोटिंग रेट लोन्स: व्यवसाय उद्देशाव्यतिरिक्त व्यक्ती आणि व्यक्तीरहित** | | | |
|---|---|---|---|
| | **टर्म लोन** | **फ्लेक्सी टर्म लोन** | **फ्लेक्सी हायब्रिड लोन** |
| **कालावधी (महिने)** | >1 | >1 | >1 |
| **पार्ट पेमेंट शुल्क** | शून्य | शून्य | शून्य |
| **पूर्ण पेमेंट शुल्क** | शून्य | शून्य | शून्य |
| **फ्लोटिंग रेट लोन्स: व्यावसायिक उद्देशासाठी व्यक्ती आणि व्यक्तिरहित**<br>**फिक्स्ड रेट लोन्स: सर्व कर्जदार (व्यक्तींसहित)** ** | | | |
| | **टर्म लोन** | **फ्लेक्सी टर्म लोन** | **फ्लेक्सी हायब्रिड लोन** |
| **कालावधी (महिने)** | >1 | >1 | >1 |
| **पार्ट पेमेंट शुल्क** | पार्ट पेमेंट वर 2% * | शून्य | शून्य |
| **पूर्ण पेमेंट शुल्क** | मुख्य थकबाकी आणि थकित फ्लेक्सी लोन टर्म मर्यादेवर 4% | उपलब्ध फ्लेक्सी लोन मर्यादेवर 4%* | फ्लेक्सी इंटरेस्ट ओन्ली लोन रिपेमेंट कालावधी दरम्यान मंजूर रकमेवर 4%*; आणि फ्लेक्सी टर्म लोन कालावधी दरम्यान उपलब्ध फ्लेक्सी लोन मर्यादेवर 4%* |

* लागू असल्याप्रमाणे GST हा प्रीपेमेंट शुल्काव्यतिरिक्त कर्जदाराद्वारे देय असेल.

** कर्जदाराने स्वत:च्या स्रोतांमधून बंद केलेल्या हाऊसिंग लोनसाठी शून्य. "स्वत:चे स्रोत" म्हणजे बँक/ एचएफसी/ एनबीएफसी आणि/किंवा फायनान्शियल संस्थेकडून लोन घेण्याव्यतिरिक्त इतर कोणतेही स्त्रोत.

कृपया बीएचएफएल कडून घेतलेल्या लोनचा बिझनेस उद्देश किंवा अन्य उद्देशाच्या वर्गीकरणासाठी 'लोनचा उद्देश' या वरील सेक्शनचा संदर्भ घ्या

तसेच, विद्यमान अटी व शर्तींव्यतिरिक्त खालील अटी लागू होतील:

A. **प्री-पेमेंटसाठी अटी**

1. पार्ट प्री-पेमेंटची रक्कम किमान 1 ईएमआय/मासिक इंस्टॉलमेंट एवढी किंवा अधिक असावी
2. कर्जदाराद्वारे पहिला ईएमआय/मासिक इंस्टॉलमेंट देय केल्यानंतरच कर्जदारातर्फे फूल आणि/किंवा पार्ट प्री-पेमेंट केले जाऊ शकते.
3. कर्जदाराने महिन्याच्या 25 तारखेपासून त्यानंतरच्या महिन्याच्या 3 तारखेपर्यंत चेकद्वारे / डिमांड ड्राफ्टद्वारे केलेले पार्ट पेमेंट/फॉरक्लोजर वगळता संपूर्ण महिन्यात केलेले पार्ट पेमेंट/फोरक्लोजर स्वीकारले जाते. (दोन्ही दिवसांचा समावेश) फ्लेक्सी टर्म लोन आणि/किंवा फ्लेक्सी हायब्रिड लोन कडून पार्ट-प्री-पेमेंट शुल्क शून्य असेल.
4. फोरक्लोजर लेटर जारी करणे: विनंतीच्या तारखेपासून 21 दिवस.
5. फ्लेक्सी टर्म लोन आणि/किंवा फ्लेक्सी हायब्रिड लोन कडून पार्ट-प्री-पेमेंट शुल्क शून्य असेल.

याद्वारे सहमती आहे की या एमआयटीसी मध्ये लोनच्या काही प्रमुख अटी व शर्ती आहेत आणि जर कर्जदाराला यापूर्वीच काही प्राप्त झाले असल्यास एमआयटीसी ला पुनर्स्थित केले जाईल. तसेच, येथे पार्टीज बिनशर्तपणे लोन कराराच्या अटी आणि त्यांच्याद्वारे अंमलबजावणी केलेल्या / अंमलबजावणी केल्या जाणाऱ्या इतर सिक्युरिटी डॉक्युमेंट्सचा संदर्भ आणि विश्वास ठेवण्यास सहमत आहेत.

कर्जदाराने सर्वात महत्त्वाच्या अटी व शर्ती असलेली सर्व 15 पृष्ठे वाचली आणि समजून घेतल्याचे मान्य केले आहे आणि एमआयटीसी च्या पहिल्या आणि शेवटच्या पानावर त्याची/तिची/त्यांची स्वाक्षरी/सामान्य शिक्का दिला आहे. कर्जदार पुढे सहमती देतो आणि पुष्टी करतो की कर्जदारांना एमआयटीसीच्या प्रत्येक पृष्ठावर स्वाक्षरी करण्याची आवश्यकता नाही आणि एमआयटीसीच्या पहिल्या आणि शेवटच्या पृष्ठावरील स्वाक्षरी पुरेशी असेल.

उपरोक्त अटी व शर्ती कर्जदाराने / कर्जदारांनी वाचली आहेत किंवा बीएचएफएल चे श्री./श्रीमती/कु.______________________________ यांनी कर्जदारास वाचून दाखविली आहेत आणि कर्जदारास / कर्जदारांना समजली आहेत.

***इंग्रजी आणि प्रादेशिक भाषेत विसंगती आढळल्यास, इंग्रजी भाषेला प्राधान्य देण्यात येईल.*

⊗
**(कर्जदारांची स्वाक्षरी किंवा अंगठ्याचा ठसा)**
**कर्जदाराचे नाव:**

⊗
**(लेंडरच्या बीएचएफएलच्या अधिकृत प्रतिनिधीची स्वाक्षरी)**
**अधिकृत स्वाक्षरीकर्त्याचे नाव**

**तारीख** **ठिकाण**

**नोंद: एमआयटीसी ची ड्युप्लिकेट कॉपी कर्जदाराला / कर्जदारांना देण्यात यावी**